RNI No. MAHBIL /2009/31732
Reg. No. MH/MR/South-320/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ५, अंक ८] गुरुवार ते बुधवार, मे ३०-जून ५, २०१३/ज्येष्ठ ९-१५, शके १९३५ [पृष्ठे ६
[किंमत : रुपये ८.००]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ मे २०१३.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मनासे. १००८/प्र.क्र. ५४/सेवा-६.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) (सुधारणा) नियम, २०१३ " असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) (सुधारणा) नियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा निर्देश ' मुख्य नियम ' असा करण्यात आला आहे.) च्या नियम ६८ च्या पोट-नियम (१) मध्ये जेथे जेथे " सहा महिने " हे शब्द नमूद केले आहे, त्याऐवजी तेथे " तीन महिने " हे शब्द घालण्यात यावे.

३. मुख्य नियमातील नियम ७३ वगळण्यात यावा.

४. मुख्य नियमासोबत जोडलेल्या परिशिष्ट-एक मध्ये,—

(ए) अनुक्रमांक २ समोरील स्तंभ ५ मधील " **राजपत्रित** शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करून " या मजकुराऐवजी " पूर्ण अधिकार, परिशिष्ट-तीन मधील मार्गदर्शक सूचनाच्या अधिन राहून आणि " हा मजकूर घालण्यात यावा.

(बी) अनुक्रमांक २ नंतर खालील अनुक्रमांक समाविष्ट करण्यात यावे,—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ए | ४० व परिशिष्ट-३ सूचना क्रमांक १ | स्वीयेतर सेवेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी चार वर्षांच्या पुढे वाढविणे. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र, संबंधित खात्याचे प्रभारी मंत्री व मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता आवश्यक. | पूर्ण अधिकार | नियमामधील तरतुदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशामधील अटींच्या/तरतुदींच्या अधीन राहून. |
| २बी | ४० व परिशिष्ट-३ सूचना क्रमांक १ | स्वीयेतर सेवेतून मूळ विभागात परत आल्यावर चार वर्षे पूर्ण होण्यापूर्वी पुन्हा स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्ती देण्याबाबत. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र, संबंधित खात्याचे प्रभारी मंत्री व मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता आवश्यक. | पूर्ण अधिकार | नियमामधील तरतुदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशामधील अटींच्या/तरतुदींच्या अधीन राहून. |

५. मुख्य नियमासोबतच्या परिशिष्ट-दोन मधील खंड (२) ऐवजी खालील खंड घालण्यात यावा :—

“(२) वेतन.—शासकीय कर्मचारी स्वीयेतर सेवेत गेला असता त्याला सर्वसाधारण नियमानुसार प्रतिनियुक्तीच्या पदाचे वेतन निश्चित करून घेणे, किंवा जर त्याची स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्ती झाली नसती तर, त्याच्या प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्याने शासनकडील पदावर जे वेतन घेतले असते ते वेतन अधिक त्या वेतनाच्या जास्तीत जास्त २० टक्के इतका, परंतु दरमहा रुपये २५० च्या कमाल मर्यादेपर्यंत, प्रतिनियुक्ती भत्ता घेणे, यापैकी कोणताही एक पर्याय स्वीकारता येतो. प्रतिनियुक्ती भत्त्याचा पर्याय स्वीकारलेल्या स्वीयेतर सेवेतील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्ती भत्त्यात केंद्र शासनाचे प्रतिनियुक्ती भत्त्यासंबंधातील आदेश व दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीनुसार ज्या स्वीयेतर सेवेतील कर्मचाऱ्यांनी शासनाकडील वेतन व त्यावर प्रतिनियुक्ती भत्ता घेण्यासाठी विकल्प दिला असेल त्यांना यापुढे खालीलप्रमाणे प्रतिनियुक्ती भत्ता देण्यात यावा :—

(अ) जेव्हा शासकीय कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती मुळच्याच ठिकाणी (within the same station) असेल तेव्हा दरमहा रुपये २५० च्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, त्याच्या मूळ वेतनाच्या ५ टक्के ;

(ब) इतर प्रकरणी, म्हणजेच जेव्हा शासकीय कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती मूळच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतरत्र ठिकाणी असेल तेव्हा दरमहा रुपये ५०० च्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, त्याच्या मूळ वेतनाच्या १० टक्के ;

मात्र त्याचे मूळ वेतन अधिक प्रतिनियुक्ती भत्ता हा कोणत्याही बाबतीत दरमहा रु. ७,३०० पेक्षा जास्त होता कामा नये.

**टीप.**—वरील (अ) च्या प्रयोजनासाठी “मूळच्याच ठिकाणी” याचा अर्थ, प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वीचे कर्मचाऱ्याच्या नियुक्तीचे ठिकाण, असा असेल.

वर परिच्छेद १ प्रमाणे अनुज्ञेय होणारा प्रतिनियुक्ती भत्ता आणखी असा मर्यादित केला जाईल की, त्याच्या मूळ विभागातील संवर्गात त्याला वेळोवेळी देय झालेले मूळ वेतन व प्रतिनियुक्ती भत्ता यांची एकूण बेरीज प्रतिनियुक्तीवर धारण केलेल्या पदाच्या वेतनमानातील कमाल वेतनाहून किंवा प्रतिनियुक्तीचे पद नियत वेतनावरील असेल तर त्या नियत वेतनाहून अधिक होता कामा नये.

ज्या स्वीयेतर सेवेतील शासकीय कर्मचाऱ्याने प्रतिनियुक्तीवरील पदाचे वेतनमान निवडले असेल आणि त्या वेतनमानातील किमान वेतन हे, त्याचे मूळ वेतन अधिक विहित दराने प्रतिनियुक्ती भत्ता यांच्या बेरजेपेक्षा बरेच अधिक असेल त्याचे बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम २० मधील तरतुदी लागू करून त्याचे वेतन निश्चित करण्यात येते, असे करताना यापुढे प्रारंभिक वेतन, हे खाली दर्शविलेल्या रकमेपेक्षा अधिक देण्यात येऊ नये :—

| | |
|---|---|
| (अ) रु. २,२०० पेक्षा अधिक मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता .. | मूळ वेतनाच्या १२.५ टक्के किंवा रु. ३३० यापैकी जी अधिक असेल ती रक्कम. |
| (ब) रु. १,००० पेक्षा जास्त पण रु. २,२०० पर्यंत मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता. .. | मूळ वेतनाच्या १५ टक्के किंवा रु. २०० यापैकी जी अधिक असेल ती रक्कम. |
| (क) रु. १,००० पर्यंत किंवा त्याहून कमी मूळ वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता. .. | मूळ वेतनाच्या २० टक्के. |

उपरोक्त तरतुदीच्या प्रयोजनासाठी " वेतन " म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ९ (३६) (एक) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे अनुज्ञेय असलेले वेतन असेल. तथापि, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ प्रमाणे अनुज्ञेय होणाऱ्या वेतनोत्तर वाढी (Stagnation increments) व तदर्थ वेतनवाढी (*ad-hoc* increments) ह्या या प्रयोजनासाठी मूळ वेतनाचा भाग समजण्यात येतील. "

६. सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचा संकेतांक २०१३०५०९१४५७३१५५०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ना. भा. रिंगणे,**
शासनाचे उप सचिव.

क्रमांक मनासे-१००८/प्र.क्र. ५४/सेवा-६,
**वित्त विभाग,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ मे २०१३.

प्रति

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/
अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे, औरंगाबाद/नागपूर/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (१० प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (१० प्रती),
विधानमंडळाचे सर्व सदस्य,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* मुख्य माहिती आयुक्त, मुंबई,
* आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व),
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२५ प्रती),
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागाच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (५ प्रती),
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर,
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला,
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी,
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड,
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१ (५ प्रती),
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेमसमोर, व. भा. चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२० (५ प्रती),
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४ (५ प्रती),
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोबल मील पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३ (५ प्रती),
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई (५ प्रती),
नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१ (५ प्रती),
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८ (५ प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती, सेवा-६.

* पत्राद्वारे.